
विविधा

# वनस्पतींची शाखीय पद्धतीने अभिवृद्धी



**प्रा.डॉ. शुभम भोसले**
(मो.नं. ७७१९९१२३८५)
श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय,
पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर




अलीकडे शेंडा कलम पद्धत लोकप्रिय झाली आहे. शेंडा कलम अनेक प्रकारे करता येते. आंबा, चिकू, फणस आणि काजू या फळझाडांत अभिवृद्धीसाठी ही पद्धत वापरतात. डोळे भरण्याच्या पद्धतीतही अनेक उपप्रकार आहेत. संत्री, मोसंबी, द्राक्षे, आणि बोर या फळपिकांची तर गुलाब, जास्वंद (हवाई जाती), सोनचाफा (सुधारित) या फुलझाडांची अभिवृद्धी या पद्धतीने केली जाते. शेंडा कलम आणि डोळा भरणे या दोन्ही पद्धतींत खुंटांची गरज असते.

शाखीय अभिवृद्धीमध्ये अनेक प्रकार आणि उपप्रकार आहेत. यातील सहा प्रकारांचा वापर अभिवृद्धीमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. कंद-मूळ या प्रकारात केळी, बटाटा, लसूण, आले, हळद, सुरण, याम, कर्दळ, अळू इत्यादींचा समावेश होतो. यातही दोन प्रकार आहेत. एका प्रकारात अवयवास मुळे फुटल्यानंतर ते मातृवृक्षापासून अलग केले जातात, तर दुसऱ्या प्रकारात अवयव मातृवृक्षापासून अलग केल्यानंतर त्यास मुळे फुटतात. पहिल्या प्रकारातील उदाहरणे म्हणजे- केळी, निशिगंध, लिली, इत्यादी. दुसऱ्या प्रकारातील उदाहरणे म्हणजे आले, हळद, ग्लॅडिओली, लसूण, बटाटा, इत्यादी.



फाटे कलमातही उपप्रकार आहेत. त्यातील हार्डवूड कटिंग आणि सेमि-हार्डवूड कटिंग तसेच सॉफ्टवूड कटिंग हे तीन प्रकार अधिक प्रमाणात वापरले जातात. यांची ठळक उदाहरणे, अनुक्रमे- द्राक्षे, अंजीर व नेरियम अरेलिया; जास्वंद व कोलिअस; जिरेनियम, इत्यादी होत. पानफुटी, निवडुंग ही याच प्रकारात म्हणजे फाटे कलमात मोडतात.

गुटी कलम हे डाळिंब, क्रोटोन, संक्रांत वेल इत्यादींमध्ये वापरतात तर दाब कलम हे पेरू, जाई, हनीसकल इत्यादींची अभिवृद्धी करण्यासाठी वापरतात.



अलीकडे शेंडा कलम पद्धत लोकप्रिय झाली आहे. शेंडा कलम अनेक प्रकारे करता येते. आंबा, चिकू, फणस आणि काजू या फळझाडांत अभिवृद्धीसाठी ही पद्धत वापरतात. डोळे भरण्याच्या पद्धतीतही अनेक उपप्रकार आहेत. संत्री, मोसंबी, द्राक्षे, आणि बोर या फळपिकांची तर गुलाब, जास्वंद (हवाई जाती), सोनचाफा (सुधारित) या फुलझाडांची अभिवृद्धी या पद्धतीने केली जाते. शेंडा कलम आणि डोळा भरणे या दोन्ही पद्धतींत खुंटांची गरज असते.

१. **कंद, मुनव्यांपासून अभिवृद्धी :** केळी, कर्दळ, अळू, बटाटा, लिली, लसूण इत्यादी कंद तपासून पाहा. त्यांवर मुळे, डोळे आहेत का ते पाहा. मातृवृक्षापासून अलगदपणे अलग करा किंवा त्यांचे चाकूने तुकडे करा. तयार केलेले बेणे कुंडीत अथवा जमिनीत लावा.

२. **छाट कलमाने अभिवृद्धी :** मलबेरी (तुती), कण्हेर, तगर, द्राक्षे, जास्वंद, मोगरा इत्यादींची फाटे कलमे तयार करा. प्रत्येक फाट्यास ४-५ डोळे राखा. खालचा छाट डोळ्यालगत घ्या, वरचा छाट डोळ्यापासून दूर घ्या. फाट्याची जाडी पेन्सिलसारखी घ्या. तयार फाटे मुळे फुटण्यासाठी कुंडीत लावा. तळाचे दोन डोळे मातीत (माध्यमात) गाडले गेले जातील असे पाहा. कुंड्यांना नियमितपणे पाणी द्या. कुंड्या सावलीत अगर पातळ सावलीत (पार्शल शेड) ठेवा.

३. **गुटी कलमाने अभिवृद्धी :** डाळिंबावर, क्रोटोनवर, रातराणीवर किंवा बोगनवेलीवर गुटी कलमे बांधा. या झाडांची पक्व व पेन्सिल जाडीची फांदी निवडा. मधल्या भागावर सुमारे १५ सें.मी. एवढ्या भागावरील पाने, काटे इत्यादी काढून टाका. मधल्या पेऱ्यावर, डोळ्याजवळ ३-५ सें.मी. लांबीची, पूर्ण गोलाकार साल काढून घ्या. त्यावर ओले स्पॅग्नम मॉस गुंडाळून पॉलिथिन कागदाने व सुतळीने मुटका आवळून बांधा.

४. **दाब कलमाने अभिवृद्धी :** दाब कलमासाठी पेरूच्या झाडावरील खोडालगतची पक्व काडी निवडा. करंगळी आकाराच्या फांदीवर, डोळ्याच्या खालच्या बाजूने, शेंड्याकडे तिरपा काप घ्या. कापात काडी



अडकवून तो भाग माती+ खत भरलेल्या पेल्यात अथवा जमिनीत दाबून बसवा. फांदी हलणार नाही अशा बेताने तिच्या शेजारी खुंटी रोवून तिला फांदी कलम केलेल्या जागी नियमितपणे पाणी द्या.

५. **शेंडा कलम किंवा मृदुकाष्ठ कलम** : शेंडा कलम आंबा, चिकू, फणस, काजू या फळझाडांत केले जाते. यासाठी खुंटरोपाची गरज असते. आंब्यासाठी गावठी जोमदार रोप दोन आठवडे ते तीन महिने वयाचे निवडावे. चिकूसाठी खिरणीचा खुंट वापरतात. त्याचे वय दीड ते दोन वर्षांचे असावे. फणसासाठी स्थानिक फणसाचे ६-९ महिन्यांचे रोप खुंट म्हणून वापरावे; तर काजूसाठी स्थानिक जातीचे, जोमदार आणि वर्षभर वयाचे रोप खुंट म्हणून निवडावे. खुंटाचा शेंडा ठरावीक उंचीवर अलगद छाटावा व त्यावर खोबण / खाच तयार करावी. ज्या जातीचे आणि फळझाडाचे कलम करावयाचे आहे, त्याची कलमकाडी



मातृवृक्षावर काढावी. कलम काडी जोमदार, रसरसलेली, फुगीर डोळ्यांची असावी. कलमकाडीवरील पाने खुडून घ्यावीत व बुडाकडील भाग पाचरीसारखा, दोन बाजूने काप घेऊन तयार करावा. खुंटावरील खोबणीत, कलमकाडी बसवावी. नंतर तो भाग पॉलिथीन टेपने घट्ट बांधावा. खुंट जमिनीत अथवा पॉलिथीन पिशवीत व्यवस्थित लावून, त्यास नियमितपणे पाणी द्यावे.

६. **डोळा भरून अभिवृद्धी** : डोळा भरणे ही पद्धत संत्री, मोसंबी, सीडलेस लिंबू, ग्रेप फ्रूट, बोर या फळपिकांत आणि हायब्रीड टी जातीच्या गुलाबाची अभिवृद्धी करण्यासाठी वापरतात. संत्री-मोसंबी, सीडलेस लिंबू, ग्रेप फ्रूट या फळपिकांचे डोळे भरण्यासाठी रंगपूर लाईम किंवा जंबेरी या जातीचे खुंट वापरतात. हे खुंट गादीवाफ्यावर वाढवून घ्यावेत. ते ९-१२ महिने वयाचे झाले की, त्यांच्या पेन्सिल जाडीच्या खोडावर इच्छित प्रकारचे आणि जातीचे डोळे भरावेत. मातृवृक्षावरून निरोगी, जातिवंत, रसरशीत, चांगल्या डोळ्यांच्या काड्या निवडून अगोदर खुंटावर इंग्रजी टी (T) आकाराचे काप घेऊन साल सैल करून घ्या. त्यानंतर डोळकाडीवरून डोळा ढालीच्या फ्लूटच्या आकाराचा, चाकूने काप घेऊन अलगद काढा. काढलेला डोळा खुंटावरील खोबणीत व्यवस्थित बसवून, वरून पॉलिथीन टेपने बांधा. केलेले कलम सावलीत ठेवावे. वाफ्यावर कलमे केली तर त्यावर काही काळासाठी पातळ सावली करा. बोरासाठी गावठी अथवा टपोऱ्या गुठळीचे खुंट वापरतात. बोरामध्ये इनसीटू पद्धतीने डोळे कलमे बांधावीत. बोरीवर डोळे भरण्याचे काम पावसाळ्यापूर्वी करावे. संत्री- मोसंबी व या वर्गातील फळझाडांचे डोळे भरण्याचे काम पावसाळा संपल्यानंतर करावे. गुलाबात डोळे भरण्याची पॉलिबॅग पद्धत सोपी, जलद आणि अधिक यशस्वी ठरली आहे. पावसाळ्यात आणि शेडिंग नेट वापरून जवळ जवळ वर्षभर ही पद्धत यशस्वीपणे वापरता येते. ■